PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 8, ISSUE 2

# संत तुकारामांच्या गाथेतील सुभाषितरुपी अभंग

**श्री. एकनाथ भिमराव पाटील**
पीएच. डी. रिसर्च स्कॉलर,
ओ. पी. जे. एस. विश्वविदयालय, चुरु,
**राजस्थान भारत**

## प्रस्तावना:

जगद्‌गुरु संत तुकाराम गाथेची अनेक अंगाने अनेक वैशिष्टये आहेत. तुकोबांनी स्वत:च्या जीवनात लहानपणापासून अनेक चढउतार पाहिलेत. पुढील काळात त्यांच्या अभंगातून जणू जीवनाची सर्वच रहस्ये उलगडत गेली. खरी ईश्वरभक्ती त्यांनी ओळखली होती, ती स्वत: आचरणात आणताना अभंगातूनही शब्दबध्द केली. ईश्वराशी भक्ती जुळल्याने विठ्ठलाचे अनेक अभंग लिहताना इतर समाज मनाकडे ही त्यांचे दुर्लक्ष झाले नाही. संपूर्ण सामाजिक जीवनाची पध्दतशीर रचना त्यांनी आपल्या अभंगात करुन ठेवली. त्यांच्या अभंगांचे शब्द एवढे वजनदार आहेत, की आजही चारशे वर्षानंतर अभंगातील प्रत्येक ओळीवर स्वतंत्र प्रबंध तयार होईल. समाजमनाची नस ओळखताना अनेक प्रस्थापित वाईट चालीरितीवर, परंपरावर त्यांनी आसूड ओढले. पण एवढयावरच न थांबता त्यावेळच्या समाजाला कसे वर्तन करावे याविषयी मार्गदर्शनही अभंगातून केले. त्यांचे हेच अभंगरुपी मार्गदर्शन आज सुभाषिते म्हणून प्रत्येक व्यक्तींच्या तोंडातून ऐकायला मिळतात. एवढा जीवंतपणा त्यांनी अभंगांमध्ये ओतप्रोत भरला होता. रुढी परंपरेच्या विरोधात जाऊन समाजात असणाऱ्या सामान्य जनतेला चांगला विचार पटवून देण्यासारखे कठीण कार्य तुकोबाने अभंगांच्या आधारे लीलया पेलले. त्यांचा प्रत्येक अभंग आणि अभंगातील प्रत्येक ओळ ही आजही सुभाषित म्हणूनच पाहावी, इतकी अर्थपूर्ण आहे. त्यांत सहजता, गेयता, लयबध्दता व चटकदारपणा ही आहे.

**संवसारा आगी आपुलेनि हातें ।**
**लावूनि मागुतें पाहूं नये ॥**

परपुरुषाचे सुख भोगण्याची इच्छा असेल तर स्वत:चे शीर कापून हातात घेतले पाहिजे इतकी देहवासना सोडण्याची तयारी हवी. स्वत:च्या संसाराला स्वत:च्याच हाताने आग लावून पुन्हा तो कसा जळत आहे हे मागे वळून सुध्दा पाहू नये, इतके वैराग्य असावे लागते. तुकाराम महाराज पतंगाची उपमा देताना म्हणतात, पतंग जसा दिव्याकडेच नीट झडप घालतो. तेव्हा तेथे आपले मरण आहे याचा तो विचारही करीत नाही. अशाच प्रकारचे धैर्य हे पतिव्रता होणाऱ्या स्वैरिणीच्या अंगी असावे लागते. असे केल्यानेच परपुरुष श्रीहरीचे सुख जीवनाच्या वाटयाला येते. अन्यथा जीवनाचा सत्यानाश कोणीही थांबवू शकत नाही.

**पावलें पावलें तुझें आम्हां सर्व ।**
**दुजा नको भाव होऊं देऊं ॥**

तुकाराम महाराज देवाजवळ आपला निस्वार्थी भाव प्रकट करताना म्हणतात, आम्हांला तुझ्या भक्तीज्ञानादी मुळे सर्व काही प्राप्त झाले आहे, आता आमच्या ठिकाणी द्वैतभाव निर्माण होऊ देऊ नकोस. हे विठ्ठला, मी जेथे जेथे पाहतो तेथे तेथे तुझेच व्यापक स्वरुप आहे. कारण तुझ्या स्वरुपाने हे त्रिभुवन व्यापले आहे. भेदवादी, अभेदवादी व भेदाभेदवादी यांची मते आणि खंडण-मंडणात्मक संवाद हे सर्व तुझ्या तात्विक स्वरुपाच्या मुळे आहेत, त्यामुळे आम्हास त्यांच्याशी वाद घालण्याचा प्रसंग येऊ देऊ नकोस. तुकाराम महाराज विठ्ठलाची व्यापकता सांगताना म्हणतात, देवा असे पहावी की ज्यात तू नाहीस असा एक परमाणू देखील नाही. कारण तुझे स्वरुप आकाशापेक्षाही मोठे आहे. मग तुझ्या अस्तित्वाविषयी वाद विवाद करण्याची आवश्यकताच काय आहे ?

**कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर- पूजनांचे ॥**

हे जग विष्णूस्वरुप आहे व भेद आणि ततसापेक्ष अभेद सत्य वाटणे हा भोंगळ भ्रम आहे असे ज्याला निश्चित ज्ञान झाले असेल त्यालाच वैष्णव म्हणावे. तोच वैष्णवांचा धर्म म्हणजे वैष्णवांचे लक्षण आहे. हे साधक भागवत भक्त हो, तुम्हीही वैष्णवाचे लक्षण ऐका. जे

तुम्ही स्वत:चे हित कराल ते खरे हित होईल. आपल्याकडून कोण्याही जीवाचा मत्सर घडू देऊ नये, कारण हेच सर्वव्यापक ईश्वराच्या पूजनाचे वर्म आहे. तुकाराम महाराज म्हणतात. जसे देहाच्या कोणत्याही एका अवयवाला सुख दु:खे झाली असता, ती देहात असणाऱ्या जीवाला प्राप्त होतात तसे सर्व जग विष्णूमय असल्यामुळे जगातील कोणत्याही जीवला सुख दु:खे दिल्यास ती ईश्वराला प्राप्त होतात, म्हणून साधक भक्तांनी 'जग विष्णूमय आहे' असा भाव ठेवून निर्भत्सर वैष्णव व्हावे, असा सल्ला तुकाराम महाराज देतात.

**योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥**

अष्टांग योगाचें भाग्य क्षमा आहे. पण त्याकरिता सुरुवातीला इंद्रियांचे दमण करावे लागते. आपला देव जर सखा झाला तर क्षमा इत्यादी सर्व भाग्य आपणहून घरी येतात. शेत जरी आपल्या मालकीचे असले तरी त्यात मशागत आणि पेरणी नाही केली तर त्यामध्ये पिक येणार नाही. असा दाखला देताना तुकाराम महाराज पुढे म्हणतात, ज्यावेळी जे उचित असेल ते आपण जाणले पाहिजे. उगाच निष्कारण वादाचे कष्ट कशाला बरे घ्यावे.

**मैत्र केला महाबळी । कामा न येती अंतकाळी ॥**

आपण कोणत्याही महान पराक्रम करणाऱ्या व्यक्तीशी मित्रत्व केले तरी त्याचा अंतकाळी उपयोग होत नाही. तुकाराम या दाखल्यातून असे सांगतात की, मरण येण्याच्या पूर्वीच रामनाम घेण्याने यमाशी सलोखा होत असल्यामुळे रामनामाचा, सामोपचाराचा उत्तम उपाय यमाजवळ दाखल करा. नाहीतर यम तुमच्यावर रागाने करकरा दात खाईल. कोटयावधी धन मिळविले तरी ते हरण केल्यावाचून काळ तुम्हाला कधीही सोडणार नाही. त्यावेळी स्त्री पुत्रादी परिवार, पराक्रम सैन्य , असंख्य आप्तइष्ट हे कधीही कामाला येत नाही. तोवर तुमचे बळ आहे की जोवर काळ आला नाही. तुकाराम म्हणतात की, सत्कारे करुन चौऱ्यांशी लक्ष योनीची येरझार चुकवा.

**तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥**

या अभंगात तुकाराम महाराज म्हणतात, प्रत्येक तीर्थक्षेत्रामध्ये गंगादी नदयांच्या रुपाने व मंदिरात विधीपूर्वक बसविलेल्या पाषाण मुर्तीच्या रुपाने देव आहे. यापुढे जाऊन तुकाराम सांगतात, संतांजवळ मात्र प्रत्यक्ष देव असतो. या करिता संतसंग लाभल्यावर त्याला शरीर समर्पण करणे  कल्याणकारक आहे. तीर्थाचे ठिकाणी श्रध्दा असेल तर तीर्थ फलद्रुप होते. संताजवळ एखादा नास्तिक-मूर्ख माणूस आला तरी तो सन्मार्गाला आणि सत्कार्याला लागतो. संतांना शरण गेल्यावर पाप आणि ताप गेल्याचा अनुभव येतो.

**शब्दा नाहीं धीर । ज्याची बुध्दि नाहीं स्थिर ॥**

ज्यांच्या शब्दाला धीर नाही, धमक नाही, म्हणजे जो आपले बोलणे प्रत्येक वेळी बदलतो व ज्याची बुध्दी एखादया तत्वाविषयी स्थिर नाही, त्या खल पुरुषाचे दर्शन होऊ नये. तसेच कधीही योगायोगानेही त्याच्या पंक्तिला बसून भोजनही करु नये. जो संतांची निंदा करतो व स्वार्थासाठी नीच व्यक्तीच्या पाया पडतो. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याच्या ओठात एक भाव आणि पोटात एक भाव आहे, अशा व्यक्तीच्या समोर ही उभे राहू नये व त्याचे दर्शनही घेवू नये.

**न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पतीमेळ हाकारुनी ॥**

मोठया अवाढव्य जंगलातील वनस्पतींच्या समुदायाला हाका मारुन, तुमच्यापैकी चंदनाचा वृक्ष कोणता ? चंदनाचा वास येतो तो कोठून येतो? असे विचारावे लागत नाही. कारण आतला गुण आपोआप बाहेर धावत असतो. त्याला कितीही आवरले तरी तो आवरला जात नाही. उदाहरण देताना तुकोबा म्हणतात, सुर्य लोकांना जागे करत नाही पण सुर्योदय होताच लोक आपोआप जागे होतात. लोकांनाही पण 'तू पृथ्वीवर प्रकाश किरणांचा वर्षाव कर' अशी सुर्याला कधी विनंती करावी लागत नाही. कारण तो आपोआपच पृथ्वीला प्रकाशित करतो. तुकाराम महाराज म्हणतात, मेघ आपोआपच मोरांना न सांगताच नाचवितो. सारांश, ज्याला जो स्वाभाविक गुण आहे तो त्याने लपविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो खरा गुण लपविला जात नाही.

**तुझें आहे तुझपाशीं । परिं तूं जागा चुकलासी ॥**

तुकाराम महाराज म्हणतात, माझा देव्हारा खरा आहे, हे मी प्रतिज्ञाने सांगतो, याकरिता माझ्या देव्हाऱ्यातील देवावर शुध्द सात्विक भाव ठेवा. त्याच्यावर बांधण्याकरिता त्रिगुणांचा फुलवरा आणा, अशी मी तुम्हाला विनंती करतो. माझे दैवत संतांच्या संगतीत किर्तन रंगात नाचते आणि अंगात भरल्यानंतर आत्मा व अनात्मा यांचा निवाडा करते. अरे तुझे आत्मसूख तुझ्याजवळच आहे, परंतू तू जागा चुकला आहेस. वस्तुत: हृदयात स्वरुपभूत सुख असताना भ्रमाने विषयात सुख आहे, असे समजून तेथे त्याचा शोध करीत आहेस. आत्मा आणि अनात्मा यांची चिवडा चिवड करुन भ्रमाने अन्योन्याध्यास करुन खऱ्या सुखाचा नाश तुझ्या घरच्या मन बुध्दीनीच केला आहे. सारांश, देवाला शरण आल्यावाचून खरे सुख कोठे आहे हे तुला कळणार नाही. प्रथम अज्ञानांधकार नष्ट व्हावा लागेल, तेव्हा सुखाचे स्थान शोधता येईल.

**आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥**

तुकाराम म्हणतात, ज्याच्या चित्तात देवाविषयी आवड आहे. अशा जातीच्या लोकांना देवाचा आशीर्वाद असो. त्यांचे क्षेम कल्याण असो. दिवसेंदिवस त्यांचे हरिविषयी पुष्कळ प्रेम वाढो. तुकाराम सांगतात, सर्व जीवांना हरिभक्तांची इच्छा असो, 'सर्वेऽ पि सुखिन: संन्तु' किंवा 'किंबहुना सर्वांमुखी । पुर्ण होऊनीं तिन्हीं लोकी ।' या श्लोक ओवी प्रमाणे वरील सुभाषित आहे.

**नको भोवतालें जगीं । पाहों जवळी राख अंगीं ॥**

देवाचा जप करीत असताना राग आला तर त्या रुपाने प्रत्यक्ष मांग जवळ आला आहे असे जाणा. मग तो राग कोठे राहतो हे भोवतालच्या जगात पाहू नका. कारण तसा त्याचा शोध करण्याची गरज नाही. तो तुमच्याजवळ फार काय पण तुमच्या अंत:करणातच असतो. तुम्ही स्वत:ला त्याच्यापासून दूर ठेवा. रागरुपी मांगाच्या संगतीत व त्याच्या पंगतीत बसून भोजन करणे मोठे पाप आहे. तुकाराम महाराज म्हणतात, अरे रागाला दूर ठेऊनच जपादि-कर्म करा आणि ब्रम्हाची प्राप्ती करुन घ्या.

**चिंतनाशी न कळें वेळ । सर्व काळ करावें ॥**

हरिचिंतन करण्याकरिता देशकालाची शुध्दी लागत नाही. याकरिता सर्व देशात सर्व काळात सतत हरि चिंतन करावे. ज्याप्रमाणे मुखाने नारायणाचे नाम गायले जाते, ते मुख प्रवित्र आहे. सर्वोत्तम हरिचे ठिकाणी निष्ठा ठेवणे हे ज्याला आवडते आणि हरि वाचून इतर संसाराचा सारा पसारा ज्या नरास खरा वाटत नाही, तो धन्य होय. सारांश, तुकाराम महाराज म्हणतात मी हा उपदेश सर्व लोकांस करित आहे.

एकूणच संत तुकाराम यांच्या प्रत्येक अभंगात एक वेगळा विचार आहे. त्यांच्या अभंगातून नवविधाशक्ती, आराध्यदैवत विठ्ठलावरील प्रेम, जीवनविषयक तत्वज्ञान जागोजागी दिसून येते. संत तुकारामांच्या समाजकार्याचे मुल्यमापन करताना डॉ. निर्मलकुमार फडकुले आपल्या एका लेखात म्हणतात, ‘समाज प्रबोधनाच्या विचारात तुकोबांनी महत्वपूर्ण भर टाकली. त्यांची अभंगवाणी घरा घरात गेली. प्रत्येकाच्या हृदयात तिन घर केलं. सामाजिक समतेच्या संदर्भात फुले, आंबेडकरानी जी चळवळ उभी केली, तिची बिजे तुकोबांच्या जीवनविचारात आणि कार्यात आढळतात. सर्व जातीतल्या सर्व माणसांना हृदयाशी धरुन त्यांना प्रबोधित करणारी संत तुकारामांची वाणी ही विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टीने सरस आणि संपन्न आहे.’[१] तुकारामांनी ‘तुका म्हणे’ अशी नाममुद्रा घेऊन आपल्या अभंगातील विषयासार्हता वाढविली आहे. त्याविषयी माधव कानिटकर म्हणतात, ‘तुका म्हणे या दोन शब्दामागे तुकारामानं जी सुंदर वाङ्‌मय मुर्ती निर्माण केली आहे, ती अद्भूत, आश्चर्यकारक आणि वंदनिय आहे.’[२] या सर्वांवरुन आजच्या २१व्या भोगवादी शतकात संत तुकारामांचे विचार महत्वाचे असून समाजासाठी ते सुभाषितरुपी दीपस्तंभ ठरत आहेत.

**निष्कर्ष :**

१. संत तुकारामांची अभंगवाणी ही समाजाला दिशा देण्याचे काम करीत आहे.
२. संत तुकाराम महाराजांचे वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान, शिकवण, जनलोकांच्यापर्यंत पोहचविण्यात खूप मोठे योगदान आहे.
३. संत तुकारामांनी सामान्य जनांच्या डोळ्यात अंजन घालताना अंधश्रध्दा, वाईट रुढी व परंपरा यांच्यावर परखडपणे टिका केली.

४. संत तुकारामांच्या गाथेतील अभंगात अर्थपूर्णता, सहजता, लयबध्दता व चटकदारपणा आल्याने त्यांच्या अनेक अभंगाना सुभाषितांचे रुप प्राप्त झाले आहे. मराठी वाड्.मयाला समृध्दीच्या शिखरावर नेण्याचे काम या सुभाषितांनी केले आहे.

## संदर्भ ग्रंथ :

१. संपादक प्राचार्य रा.तु. भगत, 'संत साहित्य आणि समाज प्रबोधन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००५ पृ.क्र. ७७
२. कानिटकर माधव, 'दैनंदिन तुकाराम गाथा', डायमंड पब्लिकेशन, पुणे, तृ.आ. नोव्हेंबर २००८

(संशोधनपर लेखासाठी घेतलेले वरील सर्व अभंग 'श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा - सरकारी प्रत' या ग्रंथामधून घेतलेले आहेत.)